INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# गंगापूर तालुक्यातील इयत्ता १ ते ५ वी च्या विद्यार्थ्यांची भाषा व गणितविषयातील संपादणूक: एक अभ्यास

**श्री. जाधव योगेश्वर रखमाजी**
एम. ए. एम. एड (नेट - शिक्षणशास्त्र, राज्यशास्त्र)
अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/10.2021-82747449/IRJHIS2110003**

**प्रस्तावना:**

प्रत्येक मूल शिकलं पाहिजे व शाळेत टिकलं पाहिजे, हे प्राधान्यक्रमाचे उदिदष्टे समोर ठेवून शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने २२ जून २०१५ रोजी ‘प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र’ या सदराखाली शासन निर्णय निर्गमित केला. या शासन निर्णयनूसार प्रत्येक मूलाला भाषा व गणित विषयाच्या इयत्ता निहाय मुलभूत क्षमता प्राप्त असणे आवश्यक होते. करिता सदर उदिदष्टे पूर्तीसाठी जिल्हा निहाय भाषा व गणित विषयाच्या मुलभूत क्षमता प्राप्तीसाठी सर्व शिक्षक व विद्यार्थी यांना उपयुक्त ठेरल अशा कृती कार्यक्रमांची आखणी प्रत्येक जिल्हयांच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थामार्फत करण्यात आली.

प्रत्येक विद्यार्थ्याला मूलभूत क्षमता प्राप्तीसाठी अधिक सुलभ व्हावे म्हणून राज्य स्तरावर भाषा व गणित अध्ययन साहित्य संचाची निर्मिती करण्यात आली. तसेच १००% शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या १००% शाळांना सदर साहित्य संच राज्यस्तरावरुन पुरविण्यात आले. ज्या विद्यार्थ्यांना इयत्तानिहाय मूलभूत क्षमता प्राप्त नव्हत्या त्यांच्यासाठी जिल्हानिहाय कृती कार्यक्रमांची आखणी केली गेली. त्याचाच एक भाग म्हणून औरंगाबाद जिल्हयातील १ ते ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी अध्ययन स्तर निश्चिती कार्यक्रम आखला गेला. या अंतर्गत गंगापूर तालुक्यामध्ये सदर उपक्रमांची / कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली व त्याद्वारे विद्यार्थी संपादणूकीचा अभ्यास करण्यात आला.

**उदिदष्टे :**

१. भाषा व गणित विषयामध्ये विद्यार्थ्यांना इयतानिहाय प्राप्त असलेल्या मुलभूत क्षमतांचा शोध घेणे.

२. विद्यार्थ्यांना प्राप्त असलेल्या क्षमतानिहाय / स्तरनिहाय कृती कार्यक्रमाची आखणी / निश्चिती करणे.

३. भाषा व गणित पेटीच्या प्रभावी वापरासाठी केंद्रिय शिक्षण परिषदांचे आयोजन करणे.

४. भाषा व गणित विषयांत विद्यार्थ्यांना प्राप्त क्षमता / स्तरानुसार कृती कार्यक्रमाची शैक्षणिक वर्षात कालबध्द पध्दतीने अंमलबजावणी करणे.

५. शाळांना ठरवून दिलेल्या कृती कार्यक्रमांची स्तरनिहाय / क्षमतानिहाय पडताळणी करणे.

**पध्दती :**

भाषा व गणित विषयासाठी शैक्षणिक वर्षामध्ये तीन टप्प्यामध्ये सदर कार्यक्रम राबविला गेला. प्रत्येक टप्प्यानंतर प्रायोगिक उपाययोजनांची (कृती कार्यक्रमांची) अंमलबजावणी केली गेली. म्हणजेच प्रायोगिक संशोधन पध्दती अंतर्गत सदर विषयाचा अभ्यास करण्यात आला.

**कार्यवाही :**

सदर कार्यक्रमांतर्गत भाषा व गणित विषयातील स्तरनिहाय संपादणूक अभ्यासवयाची होती, त्यामुळे प्रथमत: इयत्तानिहाय आणि स्तरनिहाय चाचण्यांची निर्मिती करण्यात आली.

१. चाचणी निर्मितीनंतर तीन टप्यामध्ये अध्ययन स्तर निश्चिती करण्यात आली. टप्पा १- जुलै २०१९, टप्पा २ - ऑक्टोबर २०१९, टप्पा ३ - फेब्रुवारी २०२०.

२. सदर चाचणीची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी केंद्रातील CRG सदस्याची (भाषा व गणित विषय शिक्षकांची) स्तर निर्धारक म्हणून केंद्र स्तरावर निवड करण्यात आली.

३. अध्ययन स्तर निश्चिती टप्पा क्र. १ मध्ये स्तर निश्चिती केल्यानंतर प्राप्त परिणामांच्या आधारे शिक्षकांना स्तरनिहाय कृती कार्यक्रम किमान त्या त्या इयत्तांच्या अंतिम स्तरांत जाण्यासाठी भाषा व गणित पेटीतील माहितीच्या आधारे कृती कार्यक्रमांची माहिती प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे केंद्र स्तरावर देण्यात आली. तसेच पूरकवाचन व गणितीय क्रियांसाठी दररोज स्तरनिहाय सराव संच व्हाटसअॅपच्या माध्यमातून देण्यात आले.

४. प्रथम टप्यातील उपाययोजनानंतर टप्पा क्र. 2 मध्ये स्तर निश्चिती करण्यात आली. प्राप्त परिणामानुसार पुन्हा कृती कार्यक्रम देण्यात आला. आणि वर्षा अखेरीस पुन्हा विद्यार्थ्यांना अवगत क्षमता / स्तरामधील संपादणूकीसाठी अध्ययनस्तर निश्चिती टप्पा क्र. ३ ची अंमलबजाणी फेब्रुवारी २०२१ मध्ये केली गेली.

५. अध्ययन स्तर निश्चिती टप्पा क्र. १ टप्पा क्र. 2 आणि टप्पा क्र. ३ या दरम्यान दिलेल्या कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी आणि भाषा व गणित अध्ययन साहित्य संचाचा वापर प्रभावी होतो किंवा नाही यांची पडताळणी करण्यासाठी प्रत्यक्ष शाळा भेटीद्वारे अनुधावन करण्यात आले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेद्वारे व गटसाधन केंद्र गंगापूर येथील पर्यवेक्षकीय यंत्रणेकद्वारे कृती कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

**संशोधनाचा न्यादर्श :**

सदर विषयाच्या अनुषगाने गंगापूर तालुक्यातील इयत्ता १ ते ५ वीच्या २४३ शाळेतील सर्व विद्यार्थी हे न्यादर्श म्हणून निवडण्यात आले होते. तालुक्यातील १९२३९ विद्यार्थी हे न्यादर्श होते. परंतु प्रत्यक्ष चाचणीच्या वेळी तिन्ही टप्पामध्ये सरासरी १८३३९ (९५.३२ %) विद्यार्थी उपस्थित होते.

**संख्यात्मक विश्लेषण :**

अध्ययन स्तर निश्चिती टप्पा क्र. १ ते टप्पा क्र. ३ मध्ये इयत्ता १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांची भाषा व गणितातील स्तरनिहाय सरासरी संपादणूक पुढीलप्रमाणे आढळून आली.

**सरासरी संपादणूक भाषा व गणित**

| | टप्पा क्र. १ | टप्पा क्र. २ | टप्पा क्र. ३ |
|---|---|---|---|
| **भाषा** | ५१.२६ % | ६२.३३ % | ७०.७७ % |
| **गणित** | ४९.९८ % | ६१.६४ % | ७०.३३ % |
| **भाषा व गणित सरासरी संपादणूक** | ५०.६२ % | ६१.९९ % | ७०.५५ % |

यावरुन असे दिसून येते की अध्ययन स्तर निश्चिती टप्पा क्र. १ ते ३ यामध्ये गंगापूर तालुक्यातील इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यामध्ये सरासरी १९.९३% वाढ दिसून आली.

**गंगापूर तालुका - केंद्रनिहाय अध्ययन स्तर निश्चिती विश्लेषण**

| केंद्राचे नाव | शाळा संख्या | पटसंख्या | उपस्थिती | CWSN विद्यार्थी | भाषा | | | गणित | | | भाषा व गणित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रारंभिक स्तर | उतारा वाचन | भाषा टक्केवारी संख्या | प्रारंभिक | वजाबाकी भागाकार | गणित सरासरी | |
| माळी वाडगाव | १३ | ६३० | ६१० | ०८ | ०४ | ४८० | ७८.६९ | ०२ | ४६९ | ७६.८९ | ७७.७९ |
| मालुजा | १० | ६०१ | ५९० | ०६ | ०३ | ४४९ | ७६.१० | १६ | ४६० | ७७.९७ | ७७.०३ |
| लासुर स्टेशन | ११ | ६४८ | ६०० | ०५ | ०७ | ४६२ | ७७.०० | ०६ | ४४७ | ७४.५० | ७५.७५ |
| सावखेडा | १६ | ६७० | ६५८ | १३ | ०६ | ४९० | ७४.४७ | १० | ५०४ | ७६.६० | ७५.५३ |
| गाजगाव | १६ | १२४८ | १२४४ | २४ | १० | ९३४ | ७५.०८ | ०९ | ९२५ | ७४.३६ | ७४.७२ |
| कायगाव | १४ | ११९३ | ११३५ | ३० | २० | ८३५ | ७३.५७ | १३ | ८४८ | ७४.७१ | ७४.१४ |
| अंबेलोहळ | १४ | १११५ | १०६९ | १३ | २० | ७८६ | ७३.५३ | ०९ | ७९२ | ७४.०९ | ७३.८१ |
| शेदूंरवादा | १३ | ९३२ | ९६८ | १८ | १० | ६७५ | ७४.३४ | १२ | ६४२ | ७०.७० | ७२.५२ |
| डोणगाव | १० | ८५९ | ८४० | १८ | १० | ६७५ | ७४.३४ | १२ | ६४२ | ७०.७० | ७२.५२ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शिल्लेगाव | १२ | ८६३ | ८३३ | ०६ | १७ | ५९ ९ | ७१.९१ | ०८ | ६०८ | ७२.३८ | ७१. ९० |
| गंगापूर | १३ | ९११ | ८४८ | १४ | ०८ | ५९६ | ७०.२८ | १८ | ६०७ | ७१.५८ | ९०.९३ |
| मांजरी | १७ | ६१ | १५४३ | २२ | ३२ | १११६ | ७२.३३ | ३३ | १०५४ | ६८.३१ | ७०.३२ |
| जामगाव | ०९ | ७८६ | ७१६ | १२ | ०२ | ५११ | ७१.३७ | ०३ | ४८२ | ६७.३२ | ६९.३४ |
| आसेगाव | ०९ | ८८९ | ८६४ | १६ | ०८ | ५८१ | ६७.२५ | १२ | ६०३ | ६९.७९ | ६८.५२ |
| सिध्दनाथ वाडगाव | १० | ६७४ | ६३७ | ११ | ०८ | ४३९ | ६८.९२ | १० | ४२६ | ६६.८८ | ६७.९० |
| तुर्काबाद | १६ | १६०७ | १५३७ | २२ | २५ | १०२७ | ६६.८२ | २३ | १०५९ | ६८.९० | ६७.८६ |
| ढोरेगाव | १२ | ८४४ | ८४२ | १५ | १० | ५४१ | ६४.२५ | १५ | ५६१ | ६६.६३ | ६५.४४ |
| राजंणगाव पोळ | १० | ६०८ | ५८५ | १० | १६ | ३९३ | ६७.१८ | १३ | ३६६ | ६२.५६ | ६४.८७ |
| वाळूज | १८ | २५५० | २२८० | २० | ३१ | १४६४ | ६४.२१ | २९ | १४५१ | ६३.६४ | ६३.९३ |
| एकण | २४३ | १९२३९ | १८३३९ | २८३ | २४० | १२९७८ | ७०.७७ | २४५ | १२८९८ | | ७०.५५ |
| | | | ९५.३२ | १.५४ | १.३१ | ७०.७७ | | १.३४ | ७०.३३ | ७०.३३ | ७०.५५ |

**निष्कर्ष** :

१. गंगापूर तालुक्यातील इयत्ता १ ते ५ वी च्या विद्यार्थ्यांच्या भाषा गणित विषयातील संपादणूकीत अध्ययन स्तर निश्चिती टप्पा क्र. १ ते टप्पा क्र. ३ या दरम्यान १९.९३% वाढ दिसून आली.

२. इयत्ता १ ते ५ वी मध्ये १.३५ %विद्यार्थी हे प्रारंभिक स्तरावर आढळून आले.

३. इयत्ता १ ली ते ५ वी मध्ये भाषा विषयात अंतिम स्तरावर असलेले विद्यार्थी ७०.७७% होते. (अंतिम स्तर - वजाबाकी / भागाकार)

४. इयत्ता १ ली ते ५ वीच्या वर्गामध्ये शिक्षकांनी भाषा व गणित अध्ययन साहीत्य संचाच्या आधारे विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट केल्या.

५. भाषा व गणित विषयाने अद्याप ही सरासरी २९.४५ % विद्यार्थ्यांना इयत्तानिहाय मुलभूत क्षमता / स्तर प्राप्त करणे आवश्यक वाटते / आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. आगलावे प्रदिप, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, (२०००) विद्या प्रकाशन, नागपूर

२. भिंताडे वि. रा. (१९९९), शैक्षणिक संशोधन पध्दती, नूतन प्रकाशन, पुणे

३. 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' शासन निर्णय, दिनांक २२ जुन २०१५

४. www.maa.ac.in